**नवोपक्रम विषय : शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास**

**स्पर्धा गट : पूर्व प्राथमिक गट.**



**शाळेचे नाव :** शारदाबाई पवार विद्यामंदिर शारदानगर. ( रेन्बोस्कूल)

**स्पर्धकाचे नाव : सौ.रोहिणी अमित शिर्के.**

**पत्ता :** मु.पो. खांडज. (विठ्ठलवाडी) ता. बारामती. जि. पुणे

**मोबाईल नंबर :** 9146504437

**जन्म तारीख :** 02/06/1987

**Email :** rohinishirke1583@gmail.com

**शैक्षणिक पात्रता :** M.A.(B.Ed)

**बालवाडी प्रशिक्षण**.

**सेवा कालावधी :** 7 वर्ष.

**स्पर्धा गट :** पूर्व प्राथमिक गट.

# अनुक्रमणिका

1. नवोपक्रम शीर्षक

2. स्पर्धक शिक्षक माहिती

3. शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास -उपक्रम माहिती

4. नवोपक्रम - गरज व महत्व

6. नवोपक्रम उद्दिष्टे

7. नवोपक्रमाचे फोटो

8. उपक्रमाबाबत प्रतिक्रिया

9. नवोपक्रम कार्यपद्धती

10. नवोपक्रम यशस्वीता व फलनिष्पत्ती

11- समारोप

12. संदर्भसूची

# माझा नवोपक्रम

## शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास

### माहिती -

पूर्व प्राथमिक शाळा व माझ्या शाळेतील मोठ्या गटातील विद्यार्थ्यांसाठी मी शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास हा नवोपक्रम केला लहान मुलांचे आपले घर आणि आई-बाबा हेच त्यांचे विश्व असते. लहान मुलं आपल्या आई-बाबांना सोडून राहत नाहीत. पहिल्यांदा शाळेत येताना मुले खूप रडतात त्यांना शाळेचीआवड निर्माण व्हावी यासाठी मेकॅनो जोडणे, मणी ओवणे, फुलांच्या रचना करणे, ठोकळयांच्या रचना करणे, आईस्क्रीमच्या काड्यांच्या रचना करणे यासारख्या कृती करायला दिल्या तर मुलांची शाळेबद्दल भीती कमी होऊन शाळेचीआवड निर्माण होईल . या खेळाच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होतो त्यांच्या स्नायूंचा विकास होतो.

शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास  हा उपक्रम राबविण्या पाठीमागचे कारण म्हणजे मुलांचा शारीरिक विकास व स्नायूंचा विकास होणे अत्यंत महत्त्वाचे आहे .शाळेमध्ये सुरुवातीला शिकवत असताना गाणी, गोष्टी, गप्पा,क्षेत्रभेटी,चित्र काढणे यासारख्या कृती घेत होतो परंतु या कृतीमुळे मुले कंटाळताना दिसून येत होती. शाळेमध्ये मुलांचे गैरहजर राहण्याचे प्रमाण वाढलेले होते. तसेच वर्गात शिकवत असताना मुले काहीतरी कारण सांगून सारखे बाहेर जात असायची.अशावेळी मुलांना वर्गामध्ये गुंतवून ठेवण्यासाठी काय करता येईल याचा विचार करून हा उपक्रम राबविण्याचे ठरवले. वर्गातील उपक्रम तसेच बाहेरील खेळाचे उपक्रम या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांना गुंतवून ठेवून त्यांना अभ्यासाकडे कसे  वळविले जाईल याचा विचार केला. वर्गामध्ये मुलांचे गट तयार केले. या गटामध्ये मुलांना वेगवेगळया कृती करायला दिल्या मणी ओवणे,आईस्क्रीमच्या काड्यांच्या रचना करणे, आकारावरती अंकावरती खडे बिया लावणे, मेकॅनोची वेगवेगळी कलाकृती तयार करणे तसेच जीवन व्यवहाराच्या वेगवेगळया कृती करणे, भाजी निवडणे, शेंगा सोलणे, शेंगदाणे कुटणे, पीठ मळणे,चपाती लाटणे, तांदूळ पाखडणे यासारख्या कृतीमुळे मुले वर्गात गुंतून राहायला लागली. तसेच बाहेर खेळाच्या माध्यमातून मुलांचा शारीरिक विकास व स्नायूंचा विकास कसा घडवता येईल अशा प्रकारचे खेळ मुलांना घेतले या कृती घेतल्यानंतर मुलांना आनंद झाला.

**नवोपक्रमाची गरज व महत्त्व -**

पूर्व प्राथमिक विभागातील मुलांचा वयोगट 3 ते 6 वर्ष असा आहे. लहान मूलं अनुकरणशील असतात मोठी व्यक्ती जी कृती करेल ती कृती करण्याचा प्रयत्न करत असते. लहान मुलांची निरीक्षण क्षमता खूप चांगले असते. शिकणे ही प्रक्रिया खरं म्हणजे जन्मापासूनच सुरू होते घर कुटुंब यांच्यातील अंतरक्रियांमधून मुल शिकण्याचा प्रयत्न करते या कुटुंबापासून मूल जेव्हा घरातून पहिल्यांदा शाळेत जाण्यासाठी बाहेर पडते तेव्हा त्या शाळेमध्ये सर्व मुले त्याच्यासाठी नवीन असतात. लहान मुलांना खेळाची खूप आवड असते विविध प्रकारची खेळणी मेकॅनो मुलांना खेळायला दिली तर मुले त्या खेळामध्ये रमून जातात व या खेळाची ओढ लागल्यामुळे मुलांना शाळेची आवड निर्माण होते लहानातल्या लहान वस्तू मुलांना सहज पकडता येते त्यामुळे मुलांचे अक्षर सुधारते व हातांच्या बोटांचा चांगल्या प्रकारे विकास होतो मूलं जेव्हा स्वतः कृती करतात तेव्हा ते अधिक ज्ञानग्रहण करतात. आपल्या जीवनामध्ये शालेय अभ्यासक्रमाला खूप महत्त्व आहे त्याचबरोबर मुलांचा शारीरिक मानसिक भौतिक विकास होणे तेवढेच गरजेचे असते मी शाळेमध्ये भाजी निवडून घेते, शेंगा सोलून घेते, शेंगदाणे कुटणे, पीठ मळणे ,कपड्याच्या घड्या घालणे ,चपाती लाटणे, धान्य पाखडणे या सर्व जीवन व्यवहाराच्या कृती शाळेत मुले आवडीने करतात या लहान वयातच मुलांना याची आवड निर्माण झाली तर आईला घरात घर कामात मदत होते आणि यातूनच मुलांना स्वच्छतेचे महत्व कळते आणि मुले स्वावलंबी बनतात तसेच शारीरिक कौशल्य विकसित होते.

**शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास याचे वेगळेपण-**

1. लहान मुलांना शाळेची आवड निर्माण होण्यासाठी काय करावे लागेल याचा विचार केला.

2. मुलांच्या शारीरिक विकासासाठी कोणकोणत्या Activity घेता येतील हे शोधून काढले.

3. मुलांना खेळायला दिलेली साधने मुले कशी हाताळतील हे लक्षात आले ,उदा- मुलांना त्या वस्तूचे नाव उपयोग माहीत नसतात पण ती वस्तू हवी असते वस्तू इकडून तिकडून पारखून पाहणे जोर जोरात आपटायला सुरुवात करणे त्यामधून काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करतात. उपक्रम पूर्ण झाल्यावर मुलांचे निरीक्षण करून सर्व प्रश्नांची उत्तरे लक्षात आली.

4. साधनांची माहिती झाल्यानंतर मुले सुद्धा ती साधने हाताळू लागली व स्वतः त्याची वेगवेगळी मांडणी करू लागली.

5. सर्व मुले एकत्र खेळत असल्यामुळे सहकार्याची वृत्ती निर्माण झाली होती.

6. सुरुवातीला त्या साधनांचा वापर कसा करायचा हे मी त्यांना सांगत होते, परंतु नंतर मुले स्वतःच एकमेकांशी चर्चा करून त्यामध्ये वेगळेपण घडवून आणत होते.

7. पालकांशी संवाद वाढला पालक सुद्धा घरी जीवन व्यवहाराच्या कृती मुलांना द्यायला लागले त्यामुळे मुले जास्त वेळ गुंतून राहीली.

**नवोपक्रमाची उपयुक्तता-**

1. मी घेत असलेल्या कृतीयुक्त उपक्रमामुळे मुलांना शाळेची आवड निर्माण झाली.

2. मुलांच्या हाताच्या स्नायूंचा विकास झाला.

3. मुलांचे निरीक्षण क्षमता व एकाग्रता वाढली.

4. मुलांच्या बुद्धीला चालना मिळाली त्यांचा बौद्धिक विकास होऊ लागला.

5. मुलांच्या बोटांच्या कौशल्यात वाढ झाली.

6. मुलांना नवनिर्मितीचा आनंद घेता येतो.

7. मुलांचा भावनिक विकास होतो.

8. मुलांना वाचनाची व लेखनाची दिशा समजते.

9. मुक्तीला चालना मिळाल्यामुळे विचार करण्याची क्षमता वाढली.

10. नेत्र हस्त समन्वय साधता आला आहे.

11. मुले स्वावलंबी बनतात मुला मुलांमध्ये संवाद साधला जातो.

12. मुलांमध्ये आव्हाने स्वीकारली जातात.

**नवोपक्रमाची उद्दिष्टे नवोपक्रम यासाठी केला -**

1. लहान मुलांच्या शारीरिक हालचाली होणे.

2. शाळेचीआवड निर्माण होणे.

3. खेळाच्या माध्यमातून शारीरिक भौतिक विकास घडवून आणणे.

4. मुलांना विचार करायला प्रवृत्त करणे.

5. मुलांना मनोरंजनाद्वारे अध्ययनाकडे वळवणे.

6. आनंददायी शिक्षण पद्धतीचा वापर करणे.

7. शोधक प्रवृत्ती निर्माण करणे.

8. मुलांना स्वच्छतेची सवय लागणे.

9. मुलांना स्वावलंबी बनविणे.

10.सहकार्य वृत्तीत वाढ होणे.

**शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास या नवोपक्रमाचा फायदा कोणाला व कसा -**

1. या उपक्रमाचा फायदा आमच्या लहान मुलांना नक्कीच झाला कारण यातून त्यांची विचार व निरीक्षण क्षमता वाढू लागले.

2. मुलांच्या हाताच्या स्नायूंचा विकास झाल्यामुळे त्यांना चित्र काढणे व त्यामध्ये रंग भरणे सहज सोपे झाले.

3. या उपक्रमामुळे शिक्षकांच्या विचारशक्तीला चालना मिळाली मुलांना कोणते उपक्रम दिल्यामुळे त्यांच्या स्नायूंचा विकास होईल याचा शिक्षक विचार करू लागले.

4. असे उपक्रम मुले घरी देखील करत असल्यामुळे आई-वडिलांचा मुलांना ओरडण्या मागचा ताण कमी झाला आहे.

4. मुलं एका ठिकाणी जास्त वेळ गुंतून राहतात.

5. शाळेत दिलेल्या वेगवेगळया कृतीमुळे मुले पालकांना घर कामात मदत करू लागली उदा. भाजी निवडणे शेंगा सोलणे तांदूळ .निवडणे,पीठ मळणे, चपाती करणे कपड्याच्या घड्या घालणे.

6. मुलांना कोणती कृती करायला दिल्यानंतर मुलांचा शारीरिक विकास होईल याचा मला सुद्धा खूप विचार करावा लागला त्यामुळे माझ्या विचारशक्तीला चालना मिळाली.

**उपक्रमातील कृती व विद्यार्थी विकास -**

1. मुलांचा आत्मविश्वास वाढला आहे निवडणे, सोलणे हया उपक्रमामुळे नेत्र हस्त समन्वय साधता आला आहे .

2 मुलगा असो की, मुलगी स्वयंपाक घरातील

कामे करताना दोघांनाही आनंद मिळतो .

3 मुलांच्या शरीरात चपळता येते सृजनशीलता वाढते

4) शाळेत येण्यासाठी मुले उत्साही असतात तसेच आज ताई काहीतरी नविन देणार म्हणून मूले आनंदी असतात.

5) मुलांची क्रियाशिलता वाढली आहे.

6) कृतीतून शिक्षण होत असल्यामुळे मुले क्रियाशिल राहतात सतत नविन आव्हाने स्विकारण्यास तयार असतात.

7) गटकृती मुळे आपल्या शेजारील मुलीला किंवा मुलाला सहकार्य करण्याच्या वृत्तीत वाढ होते.

8) आपण स्वतः केलेले कामाचे सादरीकरण स्वतः केल्यामुळे आत्मविश्वासाने समोरच्या व्यक्तीला पटवून देता येते.

9) स्वतः चे अनुभव घरातील तसेच बाहेरच्या व्यक्तीसमोर निर्भिडपणे व्यक्त करतात.

10) शिक्षण ही प्रक्रिया एक तर्फी नाही ती दोन्ही बाजूनी होणे येथे साध्य होते. शिक्षक व विद्यार्थी यामध्ये मैत्रीपूर्वक सबंध निर्माण होतात.

**लहान मुलांच्या स्नायूंच्या विकासासाठी घेतलेल्या कृती**

1. पाऊलांमध्ये अंतर ठेवून उभे राहणे .

2. कोणा एकाच्या मागे पळणे.

3. दोन्ही पायांनी हवेत उड्या मारणे .

4.दोन्ही पायांनी पुढे उडी मारणे. 5.दोन्ही पाय सतत आपटणे उभे राहून दोन्ही पाय सतत आपटणे.
5. खाली बसून संगीताच्या तालावर.

6. जीना धावत चढणे व उतरणे.

7. वाकड्या रेषेवर चालणे सरळ रेषेवर चालणे.

8. हात आणि पाय आत आणि बाहेर फिरवणे.

9. उलटे चालता येणे.

**नवोपक्रमाचे नियोजन**

**1. उपक्रम स्थितीचे निरीक्षण -**

लहान मुले आई-बाबांना सोडून थोड्यावेळही कोठे राहत नाहीत, आपले घर आणि आई-बाबा हेच विश्व असते . गावाकडची मुले तरी बाहेर मुलांबरोबर खेळत असतात पण शहराच्या ठिकाणी लहान मुलं चार भिंतीच्या बाहेर नसतात एकटेच घरात असतात त्यामुळे घरातील व्यक्तींची त्यांना सवय लागते अशावेळी अशी मुले घर सोडून शाळेत येण्यासाठी घाबरतात 3 ते 6 वर्ष वयातील मुलांचा इतर लोकांशी समन्वय होत नव्हता शिक्षकांचा पालकांशी जेव्हा जेव्हा संवाद होत असे तेव्हा अनेक पालकांकडून असे समजले होते की मुले इतरांच्या मिसळत नाहीत सुरुवातीला मुले जेव्हा शाळेत येतात तेव्हा खूप रडतात शाळेमध्ये मुलांचे मन कसे रमले जाईल या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात आला मुलांच्या बौद्धिक विकासाला आणि शारीरिक विकासाला चालना मिळावी या हेतूने या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली मुलांना अनेक प्रकारे कृतीतून त्यांची विचार क्षमता वाढावी या हेतूने उपक्रम राबविण्यात आला.

2. **संबंधित व्यक्ती व तज्ञ व्यक्तींशी चर्चा-**

या संदर्भात आमच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. अमोल घोडके सर, वर्षाताई गायकवाड यांच्याशी चर्चा होत होती हा उपक्रम मी करण्याचे ठरवल्यानंतर सर्व सहशिक्षकांशी चर्चा केली हा उपक्रम राबवत असताना माननीय शरद पवार फेलोशिप पुरस्कार प्राप्त श्री .अमोल घोडके सर,वर्षाताई गायकवाड यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.

3.**आवश्यक साधनांचा विचार-**

मुलांचे शाळेमध्ये मन रमण्यासाठी विविध प्रकारची खेळणी मुलांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला मुले स्वतःची खेळणी दुसऱ्या मुलांना घेऊ देत नाहीत अशावेळी दुसऱ्या मुलाला गुंतवून ठेवण्यासाठी जीवन व्यवहारा सारख्या वेगवेगळ्या कृती देण्यात आल्या मुलांच्या हाताला काम दिले की मुले गुंतून राहतात लहान मुलांना मातीत खेळायला आवडते त्यामुळे एका बाटलीमध्ये टोपणाने माती भरणे, मातीत अक्षर गिरवणे ,अंक लिहिणे, चित्र काढणे, मातीचा किल्ला बनवणे, मातीची भांडी तयार करणे अशा प्रकारे मुलांचे मातीमध्ये घेण्यात येणाऱ्या खेळाचे नियोजन केले.

4. **करावयाच्या कृतीचा क्रम-**

सुरुवातीला जेव्हा मुले शाळेत आली तेव्हा त्यांचे मन जरमण्यासाठी विविध प्रकारची खेळणी मुलांना देण्यात आली. यानंतर जेव्हा मुलांचे मन शाळेमध्ये रमायला लागले तेव्हा त्यांचा बौद्धिक विकास कसा होईल याचा विचार करून तशा पद्धतीची कृती मुलांना करण्यासाठी देण्यात आल्या. अंकावर, अक्षरावर खडे, बिया लावणे यातून मुलांना अंकाची व अक्षराची ओळख होते व त्या अक्षरांचे वळण मुलांना समजते. तसेच मणी ओवताना त्याचा पॅटर्न तयार करणे किती मण्यांचा पॅटर्न तयार झाला हे मुलांना समजते अशाप्रकारे मुलांना खेळाच्या माध्यमातून शिक्षणाकडे वळवता येते.

## कार्यवाहीचे टप्पे

| अ.क्र | दिनांक | वार | घटक | उद्दिष्ट्ये |
|---|---|---|---|---|
| १ | ०४/०७/२०२३ | मंगळवार | मणी ओवणे | नेत्र , हस्त, समन्वय. |
| २ | १४/०७/२०२३ | शुक्रवार | आकारती खडे, बिया लावणे. | लेखनपूर्व तयारी नेत्र , हस्त समन्वय |
| ३ | १९/०७/२०२३ | बुधवार | मेकॅनो जोडणे | विचार शक्तीला चालना |
| ४ | ०७/०८/२०२३ | सोमवार | आईसक्रिमच्या काड्यांच्या रचना कारणे. | बौद्धिक विकास |
| ५ | १७/०८/२०२३ | गुरुवार | भाजी निवडणे. | बोटांच्या स्नायूंचा विकास |
| ६ | १९/०८/२०२३ | शनिवार | शेंगा सोलणे. | बोटांच्या स्नायूंचा विकास |
| ७ | २२/०८/२०२३ | मंगळवार | पाखडणे, कुटणे. | नेत्र हस्त समन्वय निरीक्षण |
| ८ | ३०/०८/२०२३ | बुधवार | मातीकाम. | बौद्धिक विकास |
| ९ | १३/०९/२०२३ | बुधवार | पीठ मळणे, चपाती लाटणे. | बोटांच्या स्नायूंचा विकास |
| १० | २०/०९/२०२३ | बुधवार | गोल रिंगामधून उड्या मारणे. | शारीरिक हालचाल |
| ११ | १३/१०/२०२३ | शुक्रवार | ठोकळ्यांची रचना. | बौद्धिक विकास |
| १२ | १७/१०/२०२३ | मंगळवार | बाटलीत टोपणाने माती भरणे. | मोजणे, नेत्र हस्त समन्वय. |

**उपक्रमासाठी इतरांची मदत**

१) सर्व सह शिक्षिका यांच्याशी विचार विनिमय करता आला.

२) पालक व विद्यार्थी सहकार्य मिळाले.

# नवोपक्रमाचे फोटो



मुलांनी केलेली कलाकृती



सोलणे ,पाखडणे ,निवडणे ,लाटणे कुटणे या कृती




मणी ओवणे.




काड्यांच्या रचSना

## नवोपक्रमाबाबत पालकांच्या प्रतिक्रिया



अर्चित राहुल जाधव
शारदाबाई पवार विद्या मंदीर
मोठा गट पारवा


अर्चित राहुल जाधव हा मोठा गट पारवा या वर्गात शिकत आहे त्याच्या ताई रोहिणी शिर्के या आहेत. ताईंनी अभ्यासाबरोबर त्याच्या ताईंनी मुलांच्या बोटांच्या स्नायूंचा विकास होईल अशा प्रकारच्या Activity घेतल्या त्यामुळे त्याच्या motor skill developement होण्यासाठी खूप मदत झाली त्यामध्ये त्यांनी मणी ओवणे, माती रांगोळीत अक्षर गिरविणे, आकारावर दगड बिया लावणे, बोटाने चित्र काढणे व जिवनव्यवहाराच्या खूप गोष्टी शिकविल्या त्यामध्ये लसूण सोलने भाजी निवडणे, रुमालाच्या घड्या घालणे अशा प्रकारच्या Activity शिकवल्या त्यामुळे त्याला शाळेची आवड निर्माण झाली. व त्यामुळे त्याच्या खूप छान बदल झाला आहे. खूप छान प्रगती झाली आहे.



कु. आनंदी अमोल कोकरे.
शारदाबाई पवार विद्यामंदिर
शारदानगर
मोठा गट:- पारवा


माझी मुलगी आनंदी अमोल कोकरे ही मोठा गट पारवा या वर्गात शिकत आहे. तिच्या शिक्षिका सौ. रोहिणीताई शिर्के यांनी खूप काही मुलांना शिकवले अभ्यासाव्यतिरिक्त दैनंदिन जीवनातल्या गोष्टी शिकविल्या उदा:- रुमालाच्या घड्या घालणे, दगड, बिया, फुले यांच्या रांगोळी काढणे. वर्ग आवरणे, वर्गातील साहित्य साधनांची आवरा-आवर करणे. या उपक्रमामुळे त्याला चांगल्या सवयी लागल्या तो स्वावलंबी झाला.

ताई वर्गा मध्ये आनंदीला आकारावर खडे बिया-काड्या लावणे. लहान-मोठे मणी ओवणे. रांगोळी-मातीपासून वेगवेगळ्या कलाकृती आकारणे. यामुळे हाताच्या बोटांच्या स्नायूंचा विकास होवून तिचे सुलेखन छान सुधारले.



चि. शंभू दयावान वदक देशमुख
शारदाबाई पवार विद्यामंदिर
शारदानगर
मोठा गट - पारवा

चि. शंभू दयावान वदक देशमुख हा मोठा गट - पारवा या वर्गात शिकत आहे. त्याच्या शिक्षिकेचे नाव सौ. रोहिणी शिर्के ताई या आहेत. त्या ताईंनी अभ्यासाव्यतिरिक्त अनेक उपक्रम वर्गात राबवले जसे कि, मातीत अक्षरे गिरविणे, किल्ले बनविणे, तसेच रांगोळी पेस्टिंग, दोराकाम, आकारावरती अक्षरांवरती खडे, बिया लावणे यांमुळे माझ्या मुलाची वागणूक आनंदी झाली. तो आनंदाने सगळ्या गोष्टी करतो. तसेच त्याच्यात खूप बदल झाला त्याच्या अक्षर लेखनात सुधारणा झाली. नवासेपणा आला. त्याच्या हाताच्या स्नायूंचा, बोटांचा विकास झाला.



कु. राजवी मारुती भोईटे.
कु. तन्वी मारुती भोईटे.
शारदाबाई पवार विद्यामंदिर,
शारदानगर.
मोठा गट :- पारवा.

राजवी आणि तन्वी ह्या पारवा मोठा गट या वर्गात शिकत होत्या. त्यांच्या शिक्षिका सौ. रोहिणी शिर्के ताई यांनी अभ्यासाव्यतिरिक्त खूप काही मुलांना शिकवलं उदा :- कपड्यांच्या घड्या घालणे, रांगोळी काढणे, साफसफाई करणे अशा खूप साऱ्या दैनंदिन जीवनातल्या गोष्टी शिकविल्यामुळे राजवी आणि तन्वी स्वावलंबी झाल्या

तसेच मनी ओवणे, आकारावर खडे बिया लावणे, मातीपासून वेगवेगळ्या कलाकृती करणे यामुळे हाताच्या स्नायूंचा विकास होवून सुलेखन सुधारले.

*** उपक्रमाबाबत आलेल्या प्रतिक्रया -**

**सहकारी* शिक्षिका**

शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास हा उपक्रम छान वाटला मुलांच्या योग्य वयातच त्यांच्या स्नायूंचा विकास होण्यासाठी योग्य उपक्रम निवडले.

**पालकांची प्रतिक्रिया**

ताईंनी घेतलेला शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास हा उपक्रम अतिशय छान आहे मुलांचा शारीरिक विकास उत्तम होत आहे. तसेच बोटांच्या स्नायूंचा विकास झाल्यामुळे मुले कोणतीही वस्तू सहजपणे हाताळतात या उपक्रमातून मुलांमध्ये सहकार्याची भावना निर्माण झाली.

**नवोपक्रमाची कार्यपद्धती**

*** पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी-**

1. मुलांना वर्गात फक्त गाणी, गोष्टी , अभ्यास घेत असल्यामुळे मुले कंटाळताना दिसले.

2. विद्यार्थ्यांचे गैरहजर राहण्याचे प्रमाण वाढत चालले होते.

3. विद्यार्थ्यांबद्दल पालकांच्या खूप तक्रारी येत असत.

4. लहान मुलांना शिक्षणासाठी संवाद अत्यंत महत्त्वाचा असतो.

5. मुलांना शाळेची आवड निर्माण व्हावी यासाठी मी वेगळा उपक्रम राबविला मुले शाळेत कशी रमतील त्यांना शाळेची गोडी कशी निर्माण होईल याचा विचार करून शिक्षक म्हणून अध्ययन पद्धत बदलली.

6. मी पालकांशी संवाद साधला त्यांना जीवन व्यवहाराच्या कृती समजावून सांगितल्या आणि मुलांना या कृतीमध्ये सहभागी करून घेण्यास सांगितले.

*** कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन-**

1. या उपक्रमामध्ये मुले आनंदाने कार्यरत होते.

2. खेळाच्या माध्यमातून मुलांचा शारीरिक विकास घडत होता.

3. मुले स्वावलंबी बनली. स्वतःची कामे स्वतः करू लागली. उदा. स्वतःच्या कपड्यांची घडी घालणे, स्वतःच्या वस्तू जागेवरती ठेवणे.

4. मुले एकमेकांना मदत करू लागली.

5. बोटांच्या स्नायूंच्या विकासासाठी जे उपक्रम घेतले जात होते त्या उपक्रमामध्ये मुलांना अनेक प्रश्न पडत होते मुले कुतूहलाने विचारत होते.

* **कार्यवाही करताना आलेल्या अडचणी-**

1. सुरुवातीला होणारा पालकांचा हस्तक्षेप.

2. मुलांना सुरुवातीला साधनांची कमी होते त्यामुळे प्रत्येक मुलाला खेळणी हाताळता येत नव्हती.

3. एखाद्या मुलाला कोणतीच कृती करायची नसते नुसतेच रडत असते सर्व मुलांचे लक्ष त्या मुलाकडे जात असते ते पाहून दुसरी मुलेही रडायला लागतात.

4 . एखाद्या मुलांनी घेतलेले खेळणे तेच खेळणे दुसऱ्या मुलाला देखील हवे असते अशा वेळेत त्यांना समजावून सांगण्यात वेळ जायचा.

5. मुलांना गटात बसून कृती करण्यास देत होते परंतु गटात साहित्य अपुरे पडत असल्यामुळे मुले गोंधळ घालायची.

6. मुले एकमेकांची खोडी काढत असायची पालकांच्या तक्रारी येत होत्या.

* **माहिती विश्लेषण-**

1. एकूण 40  विद्यार्थ्यांवर हा उपक्रम घेण्यात आला.

2. प्रत्येक मुलाला कृती करण्याची संधी दिली जात होती.

3. मुले रोज शाळेत उपस्थित राहू लागली.

4. हा उपक्रम आवडल्यामुळे व मुले गुंतून राहत असल्यामुळे पालकांच्या छान प्रतिक्रिया येत होत्या.

5. एखादी खेळणी मुलांना दिली उदा - मेकॅनो मुलांना जोडायला दिले तर मुले त्यांच्या बौद्धिक क्षमतेने विचार करून वेगवेगळी कलाकृती तयार करत होती.

**- नवोपक्रमाची यशस्वीता व फलनिष्पत्ती**

1. मुले वर्गात रमू लागली.

2. मुले प्रत्येक वस्तूचे निरीक्षण करू लागली .

3.मुलांच्या शारीरिक विकासात वाढ झाली मुले एकमेकांशी संवाद साधू लागली.

4.शाळेत येण्याची ओढ निर्माण झाली.

5.मुले स्वतः कलाकृती तयार करू लागली.

6.मुलांमध्ये सहकार्याची भावना निर्माण झाली.

7.मुले विचार करू लागली.

8. मुलांचा शारीरिक विकास झाला.

9. मुलांच्या बोटांच्या स्नायूंचा विकास झाला.

10. मुलांना शाळेची आवड निर्माण झाली.

11. पालकांना हा उपक्रम खूप आवडला.

# समारोप

शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास हा उपक्रम मुलांमध्ये आलेल्या अडचणीतून राबविण्यात आला. खेळाच्या माध्यमातून मुलांना शिक्षणाकडे वळविण्यासाठी एक नवी दिशा मिळाली. मुलांमध्ये व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले. मुलांच्या विचार क्षमतेला चालना मिळाल्यामुळे मुलांच्या सृजनशीलतेला वाव मिळाला मुले नवी आव्हाने स्वीकारू लागली. त्यांना शाळेची गोडी लावू शकली अशा पालकांच्या प्रतिक्रिया मिळाल्या. उपक्रम स्पर्धेच्या माध्यमातून शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास हा छोटासा उपक्रम सादर करताना अत्यंत आनंद होत आहे. हा उपक्रम शाळेमध्ये कायमस्वरूपी राबवित राहील.

# संदर्भ

**नवोपक्रमाची रचना - स्व:त**

Video Link.

https://youtu.be/DdCwq6CL_tg?feature=shared